सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

गोकुलदास तेजपाल रुग्णालय, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग,

नविन मंत्रालय, मुंबई-४००००१.

दुरध्वनी क्रमांक:-२२६१४००३ web:- wssd-regi०२.mah.gov.in


---

क्र.झेरॉक्स-२०२६/प्र.क्र.१८/पापु.०२ दिनांक :- ३० जुलै, २०२६

प्रति,

संचालक,
माहिती व तंत्रज्ञान संचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**विषय :- पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकरीता Kyocera TASKalfa MZ४०००i ही १ नवीन Xerox Machine खरेदी करावयाच्या अनुषंगाने शासनाच्या संकेतस्थळावर निविदेची नोटीस प्रसिध्द करणेबाबत...**

**महोदय,**

पाणी पुरवठा व स्वच्छताविभागाकरीता Kyocera TASKalfa MZ४०००i ही १ नवीन Xerox Machine खरेदी करावयाच्या अनुषंगाने खाजगी पुरवठादार /संस्थांकडून मागविण्यात येणाऱ्या निविदेची नोटीस अटी व शर्तीसह, सोबत जोडली आहे.सदर निविदेची नोटीस शासनाच्या संकेतस्थळावर कृपया प्रसिध्द करावी.

**प्रशासकीय विभागाचे नाव:- पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई**

**विषय:- पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकरीता Kyocera TASKalfa MZ४०००i ही १ नवीन Xerox Machine खरेदी करण्याकरीता दरपत्रके मागविण्याबाबत.**

आपला,

Jadhav.
30/07/2026.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

(ज्ञानेश्वर जाधव)
कार्यासन अधिकारी.महाराष्ट्र शासन ,

D:\Roshan sir\DRIVE-D\SBK Work\CR2026\झेरॉक्स\पत्र निविदा.docx

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
गोकुलदास तेजपाल रुग्णालय, 7 वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग,
नविन मंत्रालय, मुंबई-४००००१.

दुरध्वनी क्रमांक:-२२६१४००३ संकेतस्थळ : wssd-regi02@mah.gov.in

---

क्र.झेरॉक्स-२०२६/प्र.क्र.१८/पापु.०२ दिनांक :-३० जुलै, २०२६

# (Tender Notice)

## दरपत्रकाबाबतच्या सूचना

पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकरीता Kyocera TASKalfa MZ४०००i ही १ नवीन Xerox Machine खरेदी करावयाची आहे. त्यानुसार खालील अटी व शर्तीस अधिन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

अटी व शर्ती विचारात घेऊन दरपत्रके **दिनांक ०६ ऑगस्ट, २०२६ वा. सायं. ५.०० वाजेपर्यंत** मोहोरबंद लिफाफ्यात, कक्ष अधिकारी (नोंदणी शाखा), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, गोकुलदास तेजपाल रुग्णालय, ७ वा मजला, क्रॉफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, नविन मंत्रालय, मुंबई-४००००१. या पत्त्यावर पाठविण्यात यावा.

१. **मुलभूत अटी व शर्ती-:**

- एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.
- मोहरबंद लिफाफ्यावर **"पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकरीता झेरॉक्स मशीन पुरवठा करणेबाबतचे दरपत्रक** "असे लिहिणे आवश्यक आहे.
- मशीन नवीन, ओरिजिनल व न वापरलेले (Brand New) असावे.
- पुरवठा केलेले मशीन दिलेल्या तांत्रिक स्पेसिफिकेशनशी पूर्णपणे सुसंगत असावे.
- मशीनसोबत आवश्यक सर्व केबल्स, ड्रायव्हर्स, मॅन्युअल व इतर ॲक्सेसरीज द्याव्यात.
- GST सहित सर्व कर, वाहतूक, विमा, लोडिंग/अनलोडिंग यांचा समावेश दरामध्ये असावा.
- मशीनची ब्रॉशर व तांत्रिक माहितीपत्रक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.
- मशीनचा यशस्वी पुरवठा, स्थापना व समाधानकारक कार्यानंतर नियमांनुसार देयक अदा करण्यात येईल.
- आवश्यक असल्यास डेमो/प्रात्यक्षिक सादर करावे.
- निविदेतील चुकीची किंवा अपूर्ण माहिती आढळल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
- बाजार भावापेक्षा जास्त दर आढळून आल्यास निवड प्रक्रिया रद्द करण्यात येईल.
- कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपुर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्विकृतीच्या कोणत्याही टप्यावर कोणतेही कारण न देता थाबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.
- सोबत जोडलेल्या विहित **विवरणपत्रामध्येच** दरपत्रके सादर करण्यात यावीत. **विहित नमुन्यात प्राप्त न झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.**

- **प्रस्तृत अटी व शर्ती मान्य असल्याचे तांत्रिक निविदा दरपत्रक मध्ये नमुद असले, तरच निविदाकाराच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.**

२. **लिफाफा संदर्भात अटी व शर्ती-:**

१. लिफाफ्यावर "पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकरीता झेरॉक्स मशीन पुरवठा करणेबाबतचे दरपत्रक" असे लिहिणे आवश्यक आहे.
२. लिफाफ्यावर दरपत्रक धारकाचे नाव असणे बंधनकार असेल.
३. निविदा सादर करताना लिफाफ्या सोबत रु.१०००/-ना-परतावा शुल्क भरणे अनिर्वाय आहे.त्याची पावती सोबत जोडावी.
४. निविदादारांकडून दरपत्रके दि. ०६ ऑगस्ट,२०२६ सांय.५.०० वा. नंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

३. **लिफाफ्यामधील आवश्यक कागदपत्रे-:**

१. संस्थेची सर्वसामान्य माहिती देणारे कागदपत्र -:

- संस्थेचे नाव-
- कार्यालयाचे संपुर्ण पत्ता-
- GST नोंदणी क्रमांक-
- दुरध्वनी क्रमांक-
- ईमेल--
- सदर निवेदेसाठी प्रस्तावित असलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याचे सही व शिक्का अनिवार्य आहे.

३.१. **लिफाफा क्रमांक ०१- तांत्रिक लिफाफासाठीचे आवश्यक कागदपत्रे :-**

- GST नोंदणी प्रमाणपत्र.
- आयकर नोंदणी क्रंमाक(पॅन कार्डची प्रत).

३.२. **लिफाफा क्रमांक ०२ - आर्थिक लिफाफामध्ये सोबत जोडलेल्या विवरणपत्रमध्ये दर भरून सिल करावा.**

४. **लिफाफा उघडण्याबाबतची कार्यपदधती**

- प्राप्त दरपत्रक दिनांक ०७ ऑगस्ट, २०२६ रोजी सह सचिव (नोंदणीशाखा) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या दालनात सकाळी ११.०० वा.उघडण्यात येतील.
- लिफाफे उघडते वेळी संस्थेचा एकच प्रतीनिधी उपस्थित राहू शकेल.
- लिफाफा उघडल्यानंतर तीन बाबी तपासण्यात येतील-.
  - संस्थेची सर्वसाधारण माहिती.
  - लिफाफा क्रंमाक ०१- तांत्रिक मुल्यमापन लिफाफा.
  - लिफाफा क्रंमाक ०२-वित्तीय लिफाफा.

  वरिल सर्व माहिती अनिवार्य आहे.
- लिफाफा क्रंमाक ०१ (तांत्रिक मुल्यमापन लिफाफा) मधील सर्व कागदपत्रांची छाननी करण्यात येईल. कागदपत्र छाननीमध्ये पात्र ठरलेल्या निविदांचाच लिफाफा क्रमांक ०२ उघडण्यात येईल.

५. **नियुक्ती नंतरच्या अटी व शर्ती —**

- निविदा स्वीकृत होऊन पुरवठा आदेश निर्गमित केल्यांनतर पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग येथे Kyocera TASKalfa MZ४०००i ही झेरॉक्स मशीन तात्काळ उपलब्ध करुन देणे पुरवठादारास बंधनकारक राहील .
- कंत्राटदारांने एकूण प्रदान केलेले करांसह देयक खालील कागदपत्रे सोबत जोडून संबंधित विभागास / कार्यालयास सादर करणे आवश्यक असेल :-

  १. देयक.

  २. देयकासोबतचे कागदपत्रे.
- वरील पुर्तता न झाल्यास पुरवठादार योग्य त्या कार्यवाहीस पात्र असेल व त्यास काळया यादीत (Black List) टाकले जाईल.

Jadhav.
30/07/2026.

(ज्ञानेश्वर जाधव)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

# विवरणपत्र

१. उत्पादकांचे /पुरवठादार /नाव :-

२. नोंदणीकृत पत्ता/ पत्रव्यवहाराचा पत्ता:-

३. दूरध्वनी क्रमांक:-

४. ईमेल:-

| अ.क्र. | मशीनचे नाव | प्रमाण / नग | दर | जीएसटी | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | Kyocera TASKalfa MZ४०००i | १ नग | | | |
| २ | मशीनचे देखभाल-दुरुस्ती करीताचा खर्च. (*खरेदी सोबतची वॉरंटी संपल्यापासुन **पुढील ०३** वर्षाची वाढीव वॉरंटी ) | - | | | |

दरपत्रक कागदपत्रात कोठेही खोडाखोड , ओव्हररायटींग ( गिरवणे ), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास दरपत्रक रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

ठिकाण :- मुंबई

दिनांक :-

स्वाक्षरी व शिक्का
दिनांकासह